साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ३५ वा | सोमवार, दि. १४/०९/२०२६ ते दि. २०/०९/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## भाजपचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश अग्रवाल यांचा ५ ऑक्टोबरला होणार अमृतमहोत्सवी वाढदिवस

### विविध उपक्रमांच्या नियोजनासाठी सत्कार सोहळा समितीची बैठक

धुळे – येथील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, ज्येष्ठ उद्योजक, अग्रवाल समाजाचे ज्येष्ठ नेते तथा विविध सामाजिक सेवा-संस्था, संघटनांचे ज्येष्ठ पदाधिकारी ओमप्रकाश पुरमणल अग्रवाल उपाख्य ओपी शेट यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त येत्या पाच ऑक्टोबरला विविध कार्यक्रम होणार आहेत. यासाठी शहरातील टॉपलाइन सिसॉर्टमध्ये शुक्रवारी (ता. ५) श्री. अग्रवाल यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस वैशिष्ट्यपूर्ण बनविण्यासाठी ओमप्रकाश अग्रवाल अमृतमहोत्सवी सत्कार सोहळा समितीची बैठक झाली. तीत विविध कार्यक्रमांच्या नियोजनाची रूपरेषा ठरविण्यात आली.

विविध राजकीय पदे भूषविलेले ओमप्रकाश अग्रवाल हे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते असून, आजही ते विविध सामाजिक संस्था-संघटनांचे आश्रयदाते म्हणूनही कार्यरत आहेत. महाविद्यालयीन जीवनात जनरल सेक्रेटरीपदापासून सुरू झालेली त्यांची कारकीर्द उत्तरोत्तर बहरत गेली. युवाकाळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघांशी जोडले गेलेल्या श्री. अग्रवाल यांनी भारतीय जनसंघाचे कोशाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष आदी राजकीय पदांवर दीर्घ काळ काम केले. अग्रवाल समाजाचे माजी अध्यक्ष, अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळाचे प्रदेश संघटनमंत्री, श्री गजानन नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक, प्रियदर्शिनी जिमखान्याचे कोशाध्यक्ष आदी पदांवर काम करतानाच श्री. अग्रवाल यांनी उद्योग क्षेत्रातही आपला दबदबा निर्माण केला. याशिवाय धार्मिक कार्यातही श्री. अग्रवाल यांनी आपला अलौकिक ठसा उमटविला. विविध संत-महंतांची प्रवचने, कथांचे कार्यक्रमही त्यांनी घेतले. ओमप्रकाश अग्रवाल यांचा येत्या ५ ऑक्टोबरला ७५ वा अर्थात अमृतमहोत्सवी वाढदिवस आहे. त्यानिमित्त सत्काल सोहळा समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीची काल (ता. ११) विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने नियोजन व रूपरेषा ठरविण्यासाठी हॉटेल टॉपलाइन रिसॉर्टमध्ये बैठक झाली. तीत प्रसिद्ध भजन गायक हंसराज रघुवंशी व दिल्ली येथील साधो बॅण्डचा सुमधुर आवाजातील भजनसंध्या कार्यक्रम घेण्यासह विविध विषयांवर चर्चा झाली. तीत समिती सदस्यांनी विविध सूचना मांडल्या व मार्गदर्शन केले.

बैठकीस शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल, माजी महापौर मोहन नवले, ज्येष्ठ नेते सुधाकर दादा बेंद्रे, रवी बेलपाठक, विजय पाच्छापूरकर, उद्योजक कैलास अग्रवाल, उद्योजक विनोद अग्रवाल, डॉ. श्रीराम भतवाल, उद्योजक संजय अग्रवाल, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नितीन बंग, महेश घुगे, ड. समीर पंडित, सुनील नेरकर, गोपाळराव केले, महापौर मायादेवी परदेशी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, जयश्री अहिरराव, प्रकाश पाटील, राजेंद्र महाले, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, भिकन वराडे, राजेश पाटील, निरंजन भतवाल, महापालिकेच्या गनटेत्या किरण कुलेवार, मनोज डिसा, संजय बोरसे, हेमंत मराठे, भाजप बेटी बचाव-बेटी पढावच्या प्रदेश संयोजिका अल्पा अग्रवाल, प्रवीण अग्रवाल, राकेश अग्रवाल आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक ओमप्रकाश खंडेलवाल, डॉ. महेश घुगरी यांनी सूत्रसंचालन केले.

## शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभाग समन्वयक पदी भगवान सुरळके, आहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदी कैलास वाकचौरे यांची तर, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष पदी बाळासाहेब दुधाळे यांची निवड

मुंबई – शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे राज्य संपर्क प्रमुख अनिल धमने पाटील आणि सोशल मिडीया राज्यप्रमुख संजय कुसळकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवळे आहे की, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्य मंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे, खा .डॉ . श्रीकांत शिंदे, प्रशांत पालांडे, यांच्या मागदर्शनाखाली ओबीसी नेते तथा शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे प्रदेशाध्यक्ष अँड. डॉ पी बी कुंभार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभाग प्रदेश समन्वयक पदी भगवान सुरळके, आहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदी कैलास वाकचौरे यांची तर, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष पदी बाळासाहेब दुधाळे यांची नियुक्ती पत्र प्रदेशाध्यक्ष अँड. डॉ पी बी कुंभार यांच्या सही निशी देण्यात आले. यावेळी इतर पदअधिकारी यांची उपस्थिती होती. सदर नियुक्ती पत्रावर वंदनीय हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार प्रसार कराल व तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन संघटन वाढवून कार्य कराल असा विश्वास व्यक्त करूण आपणास पुढील कार्यास शुभेच्छा देतोत असा उल्लेख नियुक्ती पत्रात केलेला आहे या निवडी बद्दल शिवसेना बारा बलुतेदार विभागाचे सर्व पदाधिकारी, शिवसैनिकांनी निवनिर्वाचित पदाधिकारी त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव केला जात आहे .



# धुळे एस.व्ही.के.एम. मध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा भक्तिमय जल्लोष, चिमुकल्या गोपाळांनी रंगवला श्रीकृष्ण जन्माष्टमीचा भक्तिमय सोहळा

धुळे – धुळे येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये नर्सरी ते इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळावी, त्यांच्यात आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सकारात्मक मूल्यांची जोपासना व्हावी, या उद्देशाने या विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रार्थनेने झाली. त्यानंतर मुख्याध्यापिका सौ. सुनंदा मेनन यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. दीपप्रज्वलनातून ज्ञान, सकारात्मकता आणि सद्विचारांचा प्रकाश विद्यार्थ्यांच्या जीवनात निर्माण होण्याचा संदेश देण्यात आला. इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सभेचे सूत्रसंचालन केले. ज्युनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर केले. त्यानंतर इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी आजचा सुविचार, नवीन शब्द, सकारात्मक प्रतिज्ञा आणि दिनविशेष सादर करून विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार व चांगल्या मूल्यांची प्रेरणा दिली.

इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी सुमधुर गीत सादर केले, तर इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी लघुनाटिका सादर करून आपल्या अभिनयकौशल्याचे दर्शन घडवले. सीनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. नर्सरीच्या चिमुकल्यांनी सादर केलेला रॅम्प वॉक हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षणबिंदू ठरला. कार्यक्रमाची सांगता उत्साहपूर्ण मटकी फोड उपक्रमाने झाली. या उपक्रमामुळे संपूर्ण वातावरणात आनंद आणि उत्साह निर्माण झाला. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल अभिनंदन केले. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सर्जनशीलता, कलागुण आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थी व शिक्षकांच्या सक्रिय सहभागातून ही विशेष सभा आनंददायी, उत्साहपूर्ण आणि संस्मरणीय ठरली. नर्सरी ते इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्यासाठी मिळालेल्या या सुंदर व्यासपीठाचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका सौ. सुनंदा मेनन यांच्या मार्गदर्शनाखाली सिमरन पांचाल, स्नेह गौड, शिक्षक यांनी नियोजन व समन्वयाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

# धुळे जिल्ह्यात २७ सप्टेंबरपर्यंत प्रतिबंधात्मक मनाई आदेश लागू

धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबादीत राखण्यासाठी १३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत प्रतिबंधात्मक मनाई आदेश मुंबई पोलिस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये लागू राहतील, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शरद पवार यांनी दिले आहेत. सदरचे आदेश पाच पेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणूकीस मनाई करील. या कालावधीत सभा, मिरवणूका, मोर्चा, मिटींग कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी घ्यावी. तसेच लग्नकार्य किंवा प्रेतयात्रेच्या जमावास शासनाने वेळोवेळी दिलेले निर्बंध लागू असतील. हा आदेश १३ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या मध्यरात्री १२.०१ वाजेपासून ते २७ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या रात्री ११.५५ वाजेपर्यंत लागू राहील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## वरुळ येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये चौथीच्या विद्यार्थ्यांनी साकारली शिक्षकांची भूमिका

शिरपूर – तालुक्यातील वरुळ येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारली असून शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. चौथीच्या विद्यार्थ्यांनी वर्गात जाऊन उपस्थिती घेणे, विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, विविध विषयांचे अध्यापन करणे तसेच शैक्षणिक उपक्रम घेणे अशा विविध जबाबदाऱ्या उत्साहाने पार पाडल्या. शिक्षकाची भूमिका साकारताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि जबाबदारीची भावना विकसित झाली. मुख्याध्यापिका सौ. सपना मराठे यांच्या मार्गदर्शन व नियोजनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना शिक्षकांचे कार्य, त्यांची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांच्या घडणीत शिक्षकांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विविध शैक्षणिक व मनोरंजक उपक्रमांमुळे शाळेतील वातावरण आनंदी व उत्साहपूर्ण झाले. चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका अत्यंत आत्मविश्वासाने साकारल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# राष्ट्रीय लोकअदालतीला धुळे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद; १५ हजार ६११ प्रकरणे निकाली; २३ कोटी २० लाख ६७ हजार रुपयांची वसुली व नुकसानभरपाई

धुळे (जिमाका) – राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या लोकअदालतीत ४२१ प्रलंबित आणि १५ हजार १९० दाखलपूर्व अशा एकूण १५ हजार ६११ प्रकरणांचा सामोपचाराने निपटारा करण्यात आला. यातून २३ कोटी २० लाख ६७ हजार रुपयांची वसुली व नुकसानभरपाई झाली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती एस. एस. भीष्म यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील धुळे, शिरपूर, शिंदखेडा, दोंडाईचा आणि साक्री या ठिकाणी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. लोकअदालतीमध्ये न्यायालयांतील प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. दाखलपूर्व प्रकरणांमध्ये धनादेश अनादर, बँक व कर्जवसुली, वीज व पाणी बिल, कामगार तसेच इतर दिवाणी व तडजोडीयोग्य फौजदारी प्रकरणांचा समावेश होता. याशिवाय महानगरपालिका, ग्रामपंचायत, वीज थकबाकी, बँक थकबाकी आणि फायनान्स कंपनीची थकबाकी आदी प्रकरणांचाही समावेश होता. प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेश अनादर, रक्कम वसुली, मोटार अपघात नुकसानभरपाई, कामगार व सेवा विषयक वाद, वीज व पाणी बिल, वैवाहिक व कौटुंबिक वाद, जमीन संपादन, महसूल तसेच ग्राहक व इतर न्यायाधिकरणांतील तडजोडीयोग्य प्रकरणांचा समावेश होता.

राष्ट्रीय लोकअदालतीसाठी २४ हजार २३० प्रलंबित आणि ६५ हजार ४२९ दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४२१ प्रलंबित प्रकरणे आणि १५ हजार १९० दाखलपूर्व प्रकरणे, अशी एकूण १५ हजार ६११ प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांतून एकूण २३ कोटी २० लाख ६७ हजार रुपयांची वसुली व नुकसानभरपाई झाली. मोटार अपघाताच्या ११९ प्रकरणांत मोठा दिलासा – राष्ट्रीय लोकअदालतीत मोटार अपघाताच्या ११९ प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात आला. या प्रकरणांमध्ये १३ कोटी ६ लाख २७ हजार ८५५ रुपयांची नुकसानभरपाई पक्षकारांना मिळाली. लोकअदालतीमुळे पक्षकारांना परस्पर संमतीने वाद मिटविण्याची संधी मिळते. त्यामुळे वेळ व खर्चाची बचत होण्याबरोबरच प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्यास मदत होते. मोठ्या संख्येने प्रकरणे सामोपचाराने निकाली निघाल्याने पक्षकारांना दिलासा मिळाला. राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी धुळे जिल्हा वकील संघ तसेच तालुका वकील संघ, पक्षकार, पोलीस, सर्व बँका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, महावितरण कंपनी, सर्व न्यायालयीन कर्मचारी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या सर्वांचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रविण एन. कुलकर्णी यांनी आभार मानले.

# बालाजी सेवा महिला समिती मार्फत झेंडेअंजन येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात गरजू आदिवासी ७३ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, १५४ विद्यार्थ्यांना बूट-मोजे वाटप

शिरपूर – बालाजी सेवा महिला समितीच्या वतीने झेंडेअंजन येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयातील गरजू आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश, बूट व मोजे वाटप करण्यात आले. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या या उपक्रमातून ७३ विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश, तर १५४ विद्यार्थ्यांना बूट व मोजे वितरित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी सेवा समितीच्या अध्यक्षा तथा माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन अमरिशभाई पटेल होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून बालाजी सेवा कोअर कमिटी सदस्या सौ. रिताबेन पटेल, श्रीमती कक्कूबेन पटेल, उपनगराध्यक्षा संगीता देवरे, सीईओ डॉ. उमेश शर्मा, मीनाक्षी राठी, सीमा रंधे, दिव्या जैन, डिंपल गुजराथी, चारू पाटील, तस्मिन जळगांववाला, तसेच झेंडेअंजनच्या सरपंच रेखाबाई देशमुख, उपसरपंच मोतीलाल देशमुख, पोलीस पाटील प्रताप पावरा, सामाजिक कार्यकर्ते भरत देशमुख आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चैत्राम गायकवाड उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात सौ. जयश्रीबेन अमरिशभाई पटेल यांनी विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन भविष्यात स्वावलंबी व्हावे, स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, शिक्षणाला प्राधान्य देत व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे आवाहन केले. या शाळेतून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदांवर जावे, यासाठी आवश्यक ती सर्व मदत संस्थेच्या माध्यमातून करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पी. एन. गोसावी यांनी केले. यावेळी आमदार अमरिशभाई पटेल यांनी आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करण्यात आलेल्या विविध कार्यांची माहिती दिली. स्वर्गीय मुकेशभाई चॅरिटेबल ट्रस्ट, अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची तसेच बालाजी सेवा समितीमार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

बालाजी सेवा कोअर कमिटी सदस्या मीनाक्षी राठी यांनी विद्यार्थ्यांना भावी शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणादायी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, आज मिळालेला गणवेश, बूट व मोजे या केवळ वस्तू नसून तुमच्यावर ठेवलेल्या विश्वासाची जबाबदारी आहे. त्यामुळे नियमितपणे शाळेत उपस्थित राहा, मन लावून अभ्यास करा, पालकांचे, शाळेचे आणि संस्थेचे नाव उज्ज्वल करा तसेच मिळालेल्या सुविधांचा योग्य उपयोग करा, असा संदेश त्यांनी दिला. या उपक्रमामुळे आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या खर्चातून मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रोत्साहन मिळाले आहे. सामाजिक बांधिलकी जपत बालाजी सेवा महिला समितीने राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. एफ. बागुल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक डी. बी. तडवी, सी. एस. पावरा, एस. एम. सोनवणे, डी. आर. सोनार, आर. एस. गिरासे, आर. ए. ठाकरे, पी. आर. मोरे, वाय. बी. पवार, जी. एम. पावरा, मनीषा पावरा, निलेश राजपूत यांनी परिश्रम घेतले.

# धुळ्यातील उद्योगवाढीला गती; पायाभूत सुविधांसाठी १७ कोटी–उद्योगमंत्री उदय सामंत

## उद्योजकांच्या अडचणींच्या सोडवणुकीत हलगर्जीपणा खपवून घेणार नाही–पालकमंत्री जयकुमार रावल

## उद्योजकांच्या अडीअडचणींच्या सोडवणुकीसाठी दर आठवड्याला 'उद्योग जनता दरबार'



धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्यात उद्योगवाढीला गती देण्यासाठी उद्योगांना आवश्यक पाणी, वीज, रस्ते, अग्निशमन यासह सर्व पायाभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून द्याव्यात. उद्योजकांच्या अडीअडचणी स्थानिक पातळीवर तातडीने सोडवाव्यात आणि प्रलंबित औद्योगिक विकासकामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी संबंधित यंत्रणांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी धुळे जिल्हा उद्योग विभागांतर्गत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तसेच खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. यावेळी राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल, खासदार शोभा बच्छाव आमदार मंजुळा गावित, अनुप अग्रवाल, राघवेंद्र भदाणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (MIDC) मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) दीपेंद्र सिंह कुशवाह (दूरदृश्य प्रणालीद्वारे), तसेच जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांच्यासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य अभियंता, जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त (उद्योग व सेवा), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे धुळे येथील प्रादेशिक अधिकारी, महावितरण व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, विविध बँकांचे प्रतिनिधी, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच धुळे जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजक उपस्थित होते. यावेळी उद्योजकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची संबंधित विभागाने गांभीर्याने दखल घेऊन त्यावर सकारात्मक व कालबद्ध कार्यवाही करावी, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी यावेळी दिले.

अवधानचे अग्निशामक केंद्र महिनाभरात सुरू करा – अवधान औद्योगिक वसाहतीतील अग्निशामक केंद्राचे काम अंतिम टप्प्यात असून ते आणखी प्रलंबित न ठेवता एका महिन्याच्या आत पूर्ण करून केंद्राचे लोकार्पण करावे, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले. औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निशामक केंद्र अत्यंत महत्त्वाचे असल्याने त्यासाठी आवश्यक सर्व प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनाही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी दिल्या.

हरमाळ पाणीपुरवठा योजना ऑक्टोबरअखेर कार्यान्वित करा – उद्योगांसाठी नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा आवश्यक असल्याने हरमाळ पाणीपुरवठा योजनेची उर्वरित कामे वेगाने पूर्ण करावीत आणि ऑक्टोबरअखेर ही योजना कार्यान्वित करावी, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी संबंधित यंत्रणेला दिले. कामाच्या अंतिम टप्प्यात कोणत्याही प्रशासकीय अथवा तांत्रिक कारणामुळे विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी केल्या.

नरडाणा एमआयडीसीची प्रशासकीय इमारत १५ दिवसांत पूर्ण करा – नरडाणा एमआयडीसीच्या प्रशासकीय इमारतीचे उर्वरित काम पुढील १५ दिवसांत पूर्ण करून तिच्या उद्घाटनाची कार्यवाही करावी, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. एमआयडीसीतील उद्योजकांना प्रशासकीय सुविधा स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ही इमारत तातडीने कार्यान्वित होणे आवश्यक असल्याचे उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी स्पष्ट केले.

नरडाणा एमआयडीसीतील उद्योगांना अखंडित वीजपुरवठा मिळण्यासाठी आवश्यक सबस्टेशनचा प्रश्नही तातडीने मार्गी लावावा, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी दिले. सबस्टेशनसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला असून महावितरण व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयातून पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, अशा सूचनाही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी दिल्या.

नवीन औद्योगिक क्षेत्रांच्या निर्मितीला गती द्या – जिल्ह्यात नव्या उद्योगांसाठी अधिक जमीन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने रावर येथील वन विभागाची जमीन नवीन औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करावी, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी संबंधित यंत्रणांना दिले. आवश्यक विभागीय समन्वय साधून जमीन उपलब्धतेतील अडथळे दूर करावेत आणि नवीन औद्योगिक वसाहतीच्या निर्मितीची पुढील प्रक्रिया वेगाने राबवावी, असेही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी सांगितले.

त्याचबरोबर साक्री मतदारसंघातील तापी काठावरील ६५ एकर जागेवर एमआयडीसी विकसित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करावी, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. जागेसंदर्भातील आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करून औद्योगिक विकासासाठी ती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही गतिमान करावी, अशा सूचनाही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी केल्या.

दर आठवड्याला उद्योजकांसाठी 'उद्योग जनता दरबार' – उद्योजकांना त्यांच्या छोट्या–मोठ्या समस्यांसाठी विविध शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी पुण्याच्या धर्तीवर धुळे जिल्ह्यातही 'जुडी पॅटर्न' राबवावा, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी आठवड्यातील एक दिवस दुपारी ३ ते ५ ही वेळ उद्योजकांसाठी राखीव ठेवून जनता दरबाराच्या धर्तीवर त्यांच्या अडीअडचणी ऐकाव्यात, असे उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी सांगितले.

या उद्योग जनता दरबारात लघु, मध्यम तसेच मोठ्या उद्योगांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या प्रश्नांवर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी समन्वयातून शक्यतो तातडीने निर्णय घ्यावा. तत्काळ निर्णय शक्य नसलेल्या प्रकरणांना निश्चित कालमर्यादा देऊन त्यांचा नियमित पाठपुरावा करावा, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी जिल्हा प्रशासन व संबंधित यंत्रणांना दिले.

पायाभूत सुविधांच्या कामांसाठी १७ कोटी – औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कामे दर्जेदार आणि वेगाने पूर्ण करण्यासाठी धुळे औद्योगिक क्षेत्रासाठी ७ कोटी, तर नरडाणा एमआयडीसीतील रस्त्यांच्या दुरुस्ती व सुधारणेसाठी १० कोटी असा एकूण १७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून या निधीतून प्रस्तावित कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

मंजूर निधीचा प्रभावी वापर करून औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व अन्य आवश्यक पायाभूत सुविधांची कामे गुणवत्तापूर्ण आणि निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. कामांमध्ये अनावश्यक विलंब होणार नाही, याची दक्षता घेऊन त्यांच्या प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा, अशा सूचनाही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

दुहेरी करप्रणालीचा प्रश्न मार्गी लावा – औद्योगिक क्षेत्रातील दुहेरी करप्रणालीमुळे उद्योजकांना येणाऱ्या अडचणींची दखल घेऊन दुहेरी करप्रणाली एकेरी करप्रणालीत रूपांतरित करण्याबाबत आवश्यक धोरणात्मक कार्यवाही करावी, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी संबंधित विभागाला दिले. उद्योजकांवरील अनावश्यक प्रशासकीय व आर्थिक भार कमी करून उद्योगस्नेही वातावरण अधिक सक्षम करण्यासाठी या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेण्याच्या दिशेने कार्यवाही करावी, असेही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी सांगितले.

पर्यायी रस्ता, बायपास अथवा पुलाबाबत पाठपुरावा करा – राष्ट्रीय महामार्गाच्या पर्यायी रस्त्याच्या प्रश्नावर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराचा पाठपुरावा करावा, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी संबंधित यंत्रणांना दिले. उद्योजक व नागरिकांची वाहतुकीची अडचण लक्षात घेऊन बायपास अथवा पूल यापैकी व्यवहार्य पर्याय निश्चित करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक समन्वय साधावा, अशा सूचनाही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी दिल्या.

धुळे जिल्ह्यात उद्योगांना पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयातून काम करावे. उद्योगांच्या पाणी, वीज, रस्ते, परवानग्या व अन्य प्रशासकीय प्रश्नांवर केवळ पत्रव्यवहार न करता प्रत्यक्ष निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. उद्योजकांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत; प्रशासनाने पुढाकार घेऊन त्यांच्या समस्या सोडवाव्यात, असे निर्देश उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

उद्योजकांच्या अडचणींच्या सोडवणुकीत हलगर्जीपणा खपवून घेणार नाही–पालकमंत्री जयकुमार रावल

उद्योजकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नावर विभागनिहाय जबाबदारी निश्चित करून कालबद्ध कार्यवाही करावी. उद्योगांच्या न्याय्य अडचणी सोडविण्यात कुठलीही तडजोड केली जाणार नाही; हलगर्जीपणा अथवा वेळकाढूपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची बाब गांभीर्याने घेतली जाईल, असे स्पष्ट निर्देश राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले. धुळे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी डीएमआयसी व डीएमएफसी प्रकल्पांचा अधिकाधिक लाभ मिळवून उद्योग, लॉजिस्टिक्स व पूरक व्यावसायिक संधी निर्माण करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करावा, असे निर्देश पालकमंत्री श्री. रावल यांनी दिले. तसेच अवधान व नरडाणा औद्योगिक वसाहतीतील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करून वीज वितरण यंत्रणा बळकट करावी, असे निर्देश त्यांनी महावितरणला दिले. उद्योजकांचे प्रश्न स्थानिक स्तरावर सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली 'उद्योग मित्र' व 'औद्योगिक सुरक्षा मित्र' बैठका नियमित घेऊन त्यातील निर्णयांच्या अंमलबजावणीचा पाठपुरावा करावा, असे निर्देश पालकमंत्री श्री. रावल यांनी दिले. बैठका केवळ चर्चेपुरत्या मर्यादित न राहता प्रलंबित प्रश्न प्रत्यक्ष निकाली निघतील, याची दक्षता घेण्यासही त्यांनी सांगितले. अवधान औद्योगिक वसाहतीतील पावसाळ्यातील पाणी निचरा, रिंगरोड, रस्त्यालगतची झाडे–झुडपे, वाढलेल्या फांद्या आणि मालवाहतुकीतील अडथळ्यांबाबत संयुक्त पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश पालकमंत्री श्री. रावल यांनी दिले. औद्योगिक परिसर स्वच्छ, सुरक्षित व वाहतुकीस सुलभ ठेवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांनी घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

डी/डी+ प्रोत्साहनपर क्षेत्रातील पात्र उद्योगांना शासन धोरणानुसार जीएसटीसंबंधी लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव व पाठपुरावा करावा, असे निर्देश पालकमंत्री श्री. रावल यांनी दिले. **(पान ४ वर)**

# धुळे जिल्ह्यातील ३,५९८ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ; आधार प्रमाणीकरण पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा–पालकमंत्री जयकुमार रावल

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची दुसरी यादी जाहीर

धुळे (जिमाका) – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत धुळे जिल्ह्यातील ३,५९८ पात्र शेतकऱ्यांचा दुसऱ्या कर्जमुक्ती यादीत समावेश करण्यात आला आहे. शासनाने आज प्रसिद्ध केलेल्या या यादीमुळे संबंधित शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यादीतील शेतकऱ्यांनी कर्ज थकबाकीची खातरजमा करून नजीकच्या आपले सेवा केंद्रावर आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे आणि शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले आहे.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ही योजना सुरू केली आहे. योजनेत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज तसेच पुनर्गठित अथवा फेरपुनर्गठित कर्जास २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

राज्यात ३.५५ लाख शेतकऱ्यांची दुसरी यादी – योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून शासनाने त्यासाठी महाआयटीची नियुक्ती केली आहे. महाआयटीने तयार केलेल्या योजना पोर्टलवर बँकांनी ३१.१७ लाख थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. संगणकीय संस्करणानंतर १६.९६ लाख पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. पहिल्या यादीतील आधार प्रमाणीकरण झालेल्या शेतकऱ्यांपैकी १२.५८ लाख पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यांवर १०,११४.९० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. त्यापैकी ७ ऑगस्ट २०२६ रोजी ६.२२ लाख शेतकऱ्यांना ५,०२८.६० कोटी रुपये, तर २४ ऑगस्ट २०२६ रोजी ६.३६ लाख शेतकऱ्यांना ५,०८६.३० कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला.

आता योजनेअंतर्गत ३ लाख ५५ हजार ६१४ पात्र शेतकऱ्यांची दुसरी यादी ११ सप्टेंबर २०२६ रोजी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये धुळे जिल्ह्यातील ३,५९८ शेतकऱ्यांचा समावेश आहे. नाशिक विभागातील एकूण २५,४७१ लाभार्थ्यांमध्ये अहिल्यानगर ९,४०४, धुळे ३,५९८, जळगाव ७,३१६, नंदुरबार १,३४५ आणि नाशिक जिल्ह्यातील ३,८०८ शेतकऱ्यांचा समावेश आहे. पालकमंत्री श्री. रावल यांनी धुळे जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. यादीत समाविष्ट सर्व ३,५९८ शेतकऱ्यांनी आवश्यक आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे आणि संबंधित यंत्रणांनीही लाभार्थ्यांना प्रक्रिया सुलभपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे, असे त्यांनी म्हटले आहे.

यादी बँक शाखा, विकास संस्था व ग्रामपंचायतींमध्ये – दुसऱ्या यादीतील लाभार्थ्यांची जिल्हानिहाय यादी परिशिष्ट 'अ' आणि बँकनिहाय यादी परिशिष्ट 'ब'मध्ये देण्यात आली आहे. संबंधित लाभार्थ्यांची यादी बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे, ही कर्जमुक्तीची यादी असून यादीतील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. धुळे जिल्ह्यातील दुसऱ्या यादीत जिल्हा बँकेशी संबंधित १५२ लाभार्थी आहेत. राज्यस्तरावरील दुसऱ्या यादीत एकूण ३ लाख ५५ हजार ६१४ लाभार्थ्यांपैकी ४१,०५१ जिल्हा बँकांशी, तर ३ लाख १४ हजार ५६३ व्यापारी बँकांशी संबंधित आहेत.

आधार प्रमाणीकरणानंतर कर्जखात्यात रक्कम – या यादीतील शेतकऱ्यांच्या कर्जबाकीची रक्कम ३१ मार्च २०२६ रोजीची आहे. १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज व इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीच्या कर्ज थकबाकीची खातरजमा करून नजीकच्या आपले सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करावे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम त्यांच्या कर्जखात्यावर जमा करण्यात येणार आहे.

राष्ट्रीयीकृत आणि व्यापारी बँकांच्या बाबतीत या यादीतील काही शेतकऱ्यांची ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा अधिक असली, तरी शासनाच्या 'हेअरकट' धोरणानुसार ही सर्व कर्जे निरंक करण्यात येणार आहेत. योजनेतील पात्र लाभार्थ्यांमध्ये मृत शेतकरी तसेच वयोवृद्ध व बोटांच्या ठशाची नोंद होत नसलेल्या लाभार्थ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यासाठी शासनाने १९ ऑगस्ट २०२६ रोजी स्वतंत्र मानक कार्यप्रणाली (डजझ) निर्गमित केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणारी महत्त्वाची योजना आहे. धुळे जिल्ह्यातील दुसऱ्या यादीत समाविष्ट सर्व ३,५९८ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करून कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा. बँका व संबंधित यंत्रणांनीही लाभार्थ्यांना आवश्यक सहकार्य करून ही प्रक्रिया अधिक सुलभ करावी, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले आहे.




# आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप

शिरपूर – शहरातील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात इयत्ता ५ वी ते १० वी च्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. एकूण १२५ विद्यार्थ्यांना शालेय गणवेश लाभ मिळाला. याप्रसंगी शिरपूर एज्युकेशन सोसायटी ट्रस्टी तथा शिरपूर-वरवाडे नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, ट्रस्टी सौ. कृतीबेन पटेल, ट्रस्टी सौ. स्नेहा पारेख, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, श्री बालाजी संस्थान उपाध्यक्ष गोपाल भंडारी, उपनगराध्यक्षा संगीता देवरे, विश्वस्त अतुल भंडारी, विश्वस्त विजय भंडारी, शिरपूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विठ्ठल घुगे, वानखेडे साहेब, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अॅकडमिक इन्चार्ज पी. व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील, पर्यवेक्षक वाय. व्ही. कोठावदे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संस्थेतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. सी. शिंपी यांनी केले.

### (पान ३ वरून) धुळ्यातील उद्योगवाढीला गती

त्याचबरोबर किमान ४० टक्के चटई क्षेत्र निर्देशांकासंदर्भातील प्रश्नावर शासन निर्णय, बांधकाम परवानगी व कार्यरत उद्योगांची वस्तुस्थिती तपासून स्पष्टता आणावी, जेणेकरून पात्र उद्योगांचे प्रोत्साहनपर लाभ अडकणार नाहीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. उद्योजकांनी मांडलेला प्रत्येक प्रश्न कोणत्या विभागाशी संबंधित आहे, त्यावर कोणत्या स्तरावर निर्णय आवश्यक आहे आणि तो किती कालावधीत निकाली निघणार, हे निश्चित करून विभागनिहाय जबाबदारी व कालमर्यादा ठरवावी, असे निर्देश पालकमंत्री श्री. रावल यांनी दिले. उद्योजकांना वारंवार शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत; प्रशासनाने स्वतः पुढाकार घेऊन त्यांच्या प्रश्नांचा शेवटपर्यंत पाठपुरावा करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उद्योग हे जिल्ह्याच्या आर्थिक विकास व रोजगारनिर्मितीचे महत्त्वाचे माध्यम असल्याने उद्योजकांच्या प्रश्नांकडे संवेदनशील, सकारात्मक आणि उद्योगस्नेही दृष्टिकोनातून पाहावे. हलगर्जीपणा व वेळकाढूपणा टाळून प्रत्यक्ष परिणाम दिसेल अशी कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री श्री. रावल यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – अॅड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)